## 'मेट्रो-३'च्या मार्गावर पावसाळ्याची तयारी

**मुंबई :** येत्या पावसाळ्यात मेट्रो-३ च्या मार्गावरील काम सुरू असणाऱ्या ठिकाणी पाणी तुंबू नये यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. ही सर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण केली जातील, असे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने (एमएमआरसी) सांगितले आहे. एमएमआरसीने मुंबई महापालिकेच्या अभियंत्यांबरोबर मेट्रो-३च्या कामांच्या ठिकाणी संयुक्त निरीक्षण करून कृती योजना तयार केली आहे. वृत्त...३

# 'मेट्रो-३' मार्गावर पावसाळ्याची तयारी

प्रतिनिधी, मुंबई

**येत्या पावसाळ्यात** मेट्रो-३ च्या मार्गावरील काम सुरू असणाऱ्या ठिकाणी पाणी तुंबू नये यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. ही सर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण केली जातील, असे एमएमआरसीने सांगितले आहे. एमएमआरसीने मुंबई महापालिकेच्या अभियंत्यांबरोबर मेट्रो-३च्या कामांच्या ठिकाणी संयुक्त निरीक्षण केले आहे. कृती योजना तयार करण्यात आली आहे. अभियंते व कंत्राटदारांना निर्देश देण्यात आले आहेत.

सध्या कुलाबा-सीप्झ या मार्गावर मेट्रो-३चे काम सुरू आहे. या मार्गावरील पर्जन्य जलवाहिन्यांची सफाई व इतर कामे प्रगतिपथावर असून ती ३१ मेच्या आत पूर्ण होतील, असा विश्वास एमएमआरसीने व्यक्त केला आहे. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणच्या प्रभाव क्षेत्रामध्ये वाहतूक सुरळीत राहावी म्हणून वाहतूक बदलाचे फलक ठळकपणे रंगवण्यात आले आहेत. रस्तारोधकांचे नियोजन करण्यात येत आहे.

एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले, 'पाणी तुंबण्याच्या संभाव्य ठिकाणी आपत्कालीन यंत्रणा आणि वाहने तैनात केली जाणार आहेत.'

## पाणी तुंबू नये म्हणून ७५ अभियंत्यांचा चमू

प्रतिनिधी, मुंबई

**मुंबईत सध्या** अनेक ठिकाणी मेट्रोची कामे सुरू असून त्यामुळे येत्या पावसाळ्यात पाणी तुंबण्याची शक्यता आहे. ही समस्या टाळण्यासाठी ७५ अभियंते, १५० कामगार व पाण्याचा निचरा करणारे ३० पंप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे तैनात करण्यात येणार आहेत.

प्राधिकरणाद्वारे सध्या मुंबईत पाच मार्गांवर मेट्रोचे काम सुरू आहे. या ठिकाणी पाणी तुंबू नये तसेच बांधकामादरम्यान अडचणी येऊ नयेत यासाठी आपत्कालीन संघ नेमण्यात आला आहे. तसेच जूनच्या पहिल्या आठवड्यात प्राधिकरणाच्या कार्यालयात आपत्कालीन मदत केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. दहिसर ते डी. एन. नगर (मेट्रो मार्ग २ अ), डी. एन. नगर ते मानखुर्द (मेट्रो मार्ग २ ब), वडाळा ते कासारवडवली (मेट्रो मार्ग ४), स्वामी समर्थनगर ते विक्रोळी (मेट्रो मार्ग ६) आणि अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व (मेट्रो मार्ग ७) या पाच मेट्रो मार्गांवरील नालेसफाई आणि राडारोडा सफाईचे काम हा चमू करणार असल्याचे प्राधिकरणाद्वारे सांगण्यात आले.

पावसाळ्यातील या कामाबद्दल प्राधिकरणाचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव यांनी सांगितले, 'मेट्रो मार्गावरील नेमून दिलेल्या ठिकाणी एक उपयुक्त वाहन तैनात असेल. या वाहनात आवश्यक ती यंत्रसामग्री आणि कामगार हजर असतील. ड्रिलिंग व पाईलिंग कामाचा राडारोडा व चिखल रस्त्यावर पसरू नये म्हणून आवश्यक असणारी यंत्रणा तेथे सज्ज असेल. बांधकामादरम्यान रस्ते खराब झाले किंवा त्यावर खड्डे पडले तर ते ताबोडतोब बुजवण्याची व्यवस्था उपलब्ध असेल. ड्रिलिंग व पाईलिंगचे काम पूर्ण झाले असल्यास तेथील रस्ता रोधक (बॅरिकेडिंग) हटवून वाहतुकीसाठी मार्ग मोकळा करणे, तसेच संबंधित महापालिका वॉर्ड कार्यालयाशी नियमित संपर्कात राहणे व मेट्रो मार्गाचे निरीक्षण करणे हे या चमूचे काम असेल.'

पूर्व द्रुतगती मार्ग (२३.५ किमी) आणि पश्चिम द्रुतगती मार्ग या दोन्ही मार्गांवरदेखील १० अभियंते, ३०० कामगार आणि पाण्याचा निचरा करणारे १२ पंप प्राधिकरणाद्वारे तैनात करण्यात येणार आहेत.